**Std 10** **Subject:**
**Marathi Sem- I** **Marks: 80**

**Time: 3 hours**

**कृतीपत्रिकेसाठी** सूचना: -

(१) सूचनेनुसार आकलनकृती व व्याकरण यांमधील आकृत्या काढाव्यात.

(२) आकृत्या पेननेच काढाव्यात.

(३) उपयोजित लेखनातील कृतीसाठी (सूचना, निवेदन) आकृतीची आवश्यकता नाही. तसेच या कृती लिहून घेऊ नयेत.

(४) विभाग ५ - उपोयोजित लेखन प्र. ५ (अ) (२) सारांशलेखन या घटकासाठी गद्य विभागातील प्र. १(इ) अपठित उतारा वाचून त्या उताऱ्याचा सारांश लिहावयाचा आहे.

(५) स्वच्छता, नीटनेटकेपणा व लेखननियमानुसार लेखन यांकडे जाणीवपूर्वक लक्ष द्यावे.

**विभाग १: गद्य**

**प्र. १ ला)** अ) **उताऱ्याच्या आधारे** सूचनेनुसार कृती **करा.**

**(१) कृती सोडवा.** (२)

(१) माशेलगावातील लेखकाच्या पुसटशा आठवणी → [ ] [ ]

आमचे मूळ गाव दक्षिण गोव्यातील माशेल. माझे बालपण तिथेच गेले. माझे मामाही याच गावातले. तिथल्या एका मैदानावर खेळल्याच्या आणि पिपंळकट्ट्यावर बसून निवांतपणा अनुभवल्याच्या पुसटशा आठवणी माझ्या मनात अधूनमधून वाऱ्याच्या लहरीसारख्या येत असतात. माझ्या वयाच्या सहाव्या वर्षी माझे वडील वारले आणि आम्हांला उदरनिर्वाहासाठी आमचे माशेल हे गाव सोडावे लागले. मी आणि माझी आई मुंबईत येऊन पोहचलो. गिरगावातल्या खेतवाडीतील देशमुख गल्लीमध्ये ' मालती निवासा'तील पहिल्या माळ्यावर छोट्याशा खोल्यांमध्ये आम्ही मायलेक राहत होतो. आर्थिक परिस्थिती पूर्णपणे खालावलेली दारिद्याशी संघर्ष करणारी माझी अल्पशिक्षित आई आणि शिक्षणासाठी आसुसलेला. पण कोणतीच फी भरणे शक्य नसल्याने 'शाळेत कसा जाऊ? ' असे प्रश्नचिन्ह घेऊन वावरणारा मी. त्यावेळचं वातावरण हे असं होतं!

पण माझ्या आईने धीर सोडला नाही. ती खचली नाही. वेगवेगळी कष्टाची काम ती करत होती. त्यातच माशेलहून मुंबईत आलेले माझे मामाही मदतीला आले. त्यांच्यामुळे मला खेतवाडीतील प्राथमिक शाळेत प्रवेश मिळू शकला. ही शाळा महापालिकेची होती. माझ्याप्रमाणेच शाळेचीही परिस्थिती बेताचीच होती; पण इथले शिक्षक मात्र मनानं खूप श्रीमंत होते. पायात चप्पलही घालायला नव्हती आशा परिस्थितीत माझी शाळा सुरु होती. वयाच्या बाराव्या वर्षापर्यंत मला अनवाणीच राहावं लागलं.

शालेय शिक्षण पूर्ण केल्यानंतर जेंव्हा हायस्कूलमध्ये प्रवेश घेण्याची वेळ आली त्यावेळी तर आणखी एक मोठ संकट समोर आलं. त्यावेळची हायस्कूलची प्रवेश फी एकवीस रुपये होती; पण आमच्याजवळ एवढे पैसे कुठून येणार? प्रवेश फी भरणे शक्य नसल्यामुळे आता माझे शिक्षण थांबणार असे वाटू लागले; पण माझ्या आईने धीर सोडला नाही.

**(२) चौकट पूर्ण करा.** (२)

(अ) लेखकांची प्राथमिक शाळा येथे होती [ ]

(आ) शाळेत कसा जाऊ? असे प्रश्नचिन्ह घेऊन वावरणारे [ ]

(३) **स्वमत -** 'माझ्या जीवनातील शिक्षकाचे स्थान ' या विषयावर तुमचे विचार लिहा. (३)

**प्र. १ ला) आ) उताऱ्याचा आधारे सूचनेनुसार कृती** करा.

(१) कोण ते लिहा. (२)

(अ) काम झाल्यावर निघण्याच्या बेतात असणारे. [ ]

(आ) सभा संमेलन गाजवणारे साहित्य संमेलनाचे अध्यक्ष. [ ]

एकदा मी पु. ल. देशपांडे यांच्याकडे काही एक निमित्ताने गेलो होतो. काम झाल्यावर मी निघण्याच्या बेतात होतो; तेवढ्यात सुनीताबाईनी मला थांबवले व विचारले, " तुम्हांला शाल दिली तर चालेल काय? "मी एका पायावर 'हो ' म्हटले. पु. ल. व सुनीताबाई यांनी मला शाल द्यावी, हा मला मोठा गौरव वाटला. ती शाल मी माझ्या खोलीतल्या सुटकेसमध्ये ठेवून दिली. वापरली मात्र कधीच नाही.

पुढे वाईला विश्वकोशाचा अध्यक्ष म्हणून मी गेलो. तिथे नदीकाठच्या प्राज्ञ पाठशाळेच्या खोलीत मी राहत असे. खोलीच्या दक्षिणेकडील खिडक्या कृष्णा नदीच्या चिंचोळ्या प्रवाहावर होत्या. थंडीच्या दिवसात एक बाई माझ्या खिडकीखालील घाटाच्या छोट्या ताटावर तिचे छोटे मुल एका टोपलीत ठेवून मासे पकडण्याच्या उद्योगात होती. तिचे बाळ कडाक्याच्या थंडीने कुडकुडत रडत होते; पण आई तिकडे बघतही नव्हती. मला मात्र राहवले नाही. मी सुटकेसमधील, 'पुलकित' शाल काढली, पाचपन्नास रुपयांच्या नोटा काढल्या व त्या बाईला हाक मारली. खिडकीतून ते सर्व खाली दिले आणि म्हटले, " त्या बाळाला आधी शालीत गुंडाळा आणि मग मासे मारत बैस. या घटनेची ऊब पुलकित शालीच्या ऊबेपेक्षा अधिक होती.

कविवर्य नारायण सुर्वे खूप सभा , संमेलन गाजवत. पुढे ते साहित्य संमेलनाचे अध्यक्षही झाले. परिणामतः त्यांच्या कार्यक्रमांना अहोरात्र भरतीच असे. प्रत्येक कार्यक्रमात सन्मानाची शाल व श्रीफळ त्यांना मिळत राही. एकदा ते मला म्हणाले, "या शाली घेऊन मी आता 'शालीन ' बानू लागलो आहे. "

**(२) एका वाक्यात उत्तर लिहा.** **(१)**

अ) कडाक्याच्या थंडीने कोण कुडकुडत रडत होते?

**(३) आकृती पूर्ण** करा. **(१)**

लेखकाला शाल देणारे जोडपे → [ ] , [ ]

(४) 'शाल व शालीनता ' यांचा पाठाच्या आधारे तुम्हाला कळलेला अर्थ स्पष्ट करा . (३)

**(इ) उताऱ्याचा आधारे सूचनेनुसार कृती** करा.

**(१) योग्य जोड्या लावा:** **(२)**

| **'अ ' गट** | **' ब गट** |
|---|---|
| (१) पहाटे फुलणारा | (अ) शेतकरी |
| (२) कामाचे नियोजन न करणारी | (ब) रातराणी |
| (३) काळोखात डवरणारी | (क) आळशी |
| (४) पेरणी करणारे. | (ड) पारिजातक |

वेळ ही फार मौल्यवान गोष्ट आहे. म्हणून वेळेचा उपयोग समजूतदारपणे केला पाहिजे. वेळेचा वेग किती आहे? वेळेसोबत आपल्याला चालत येईल का? कोणीही सांगू शकत नाही. पण जो वेळेचे भान बाळगतो तो वेळेसोबत सहज चालू शकतो. मात्र वेळेचे महत्त्व ओळखले पाहिजे वेळेचे नियोजन केले पाहिजे. मग दैनंदिन कामे व्यवस्थित पार पडतात. शिवाय इतर गोष्टीसाठी भरपूर वेळ मिळतो अशी माणसे अनेक छंद जोपासतात. घरी परतल्यावर दीड - दोन तास वाचन करू शकतात . काहीजण कुटुंबीयांसोबत गप्पागोष्टीं करतात.

वेळ नाही, हि सबब आळशी माणसे देतात. ही माणसे कामाचे नियोजन करीत नाहीत. त्यामुळे त्यांची कामे वेळेवर पडत नाहीत. त्यांना अपयश येते. शिवाय, त्यांना मोकळा वेळही मिळत नाही.

जीवनात वेळेला किती महत्त्व आहे, हे वेळेवर कळले पाहिजे. आळस केला, वेळ टळली, तर सगळेच हातचे जाते. शेतकऱ्यांने आपल्या सवडीप्रमाणे पेरणी केली, तर काय होईल? परीक्षेचे वेळापत्रक आठवणीत राहिले नाही तर सगळे वर्ष जाईल. पारिजातक पहाटे फुलतो, रातराणी काळोख्यात डवरते, चांदणे केव्हा पडावे, काळोख कधी दाटावा, हे ठरलेले आहे.

**(२)** प्रत्येकी **एका वाक्यात उत्तर लिहा.** (२)

(अ) वेळेवर काय कळायला हवे?

(आ) "वेळ नाही"ही सबब केव्हा दिली जाते?

## विभाग २: पद्य

**प्र २ रा अ) कवितेच्या आधारे सूचनेनुसार कृती** करा: (२)

(१) चौकटी पूर्ण करा.

(अ) कवीचे सर्वस्व असलेली गोष्ट → [ ]

(आ) दुःख पचवून जगणे शिकवणारी → [ ]

(इ) कवीचा जवळचा मित्र → [ ]

(ई) झोत भट्टीतील पोलादाप्रमाणे शेकलेला => [ ]

दोन दिवस वाट पाहण्यात गेले; दोन दुःखात गेले.
हिशोब करतो आहे किती राहिलेत डोईवर उन्हाळे
शेकडो वेळा चंद्र आला; तारे फुलते, रात्र धुंद झाली;
भाकरीचा चंद्र शोधण्यातच जिंदगी बरबाद झाली.

हे हात माझे सर्वस्व; दारिद्राकडे गहाण राहिले
कधी माना उंचावलेले, कधी कलम झालेले पहिले
हरघडी अश्रू वाळविले नाहीत; पण असेही क्षण आले
तेव्हा अश्रूच मित्र होऊन साहाय्यास धावून आले.

दुनियेचा विचार हरघडी केला, अगा जगमय झालो
दुःख पेलावे कसे, पुन्हा जगावे कसे, याच शाळेत शिकलो
झोतभट्टीत शेकावे पोलाद तसे आयुष्य छान शेकले
दोन दिवस वाट पाहण्यात गेले; दोन दुःखात गेले.

**(२) आकृती पूर्ण करा** (२)

कवी जगाच्या शाळेत या गोष्टी शिकले
↓ [ ] ↓ [ ]

**(३) खालील शब्दांचे अर्थ लिहा.** **(२)**

(अ) हरघडी

(आ) शेकणे

(इ) जिंदगी

(ई) बरबाद

(४) **"दोन दिवस वाट पाहण्यात** गेले**; दोन** दुःखात गेले **हिशोब करतो आहे किती राहिलेत डोईवर उन्हाळे " या पंक्तीमधील अर्थ सौंदर्य स्पष्ट करा.** (२)

**(**आ**)** खालील **दोन कवितापैकी कोणत्याही** एका कवितेसंबंधी **दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे कृती सोडवा.**

अंकिला मी दास तुझा **किंवा** योगी सर्वकाळ सुखदाता

**मुद्दे** -

(१) प्रस्तुत कवितेचे कवी / कवियत्री (१)

(२) प्रस्तुत कवितेचा विषय (१)

(३) प्रस्तुत ओळीचा सरळ अर्थ लिहा. (२)

अंकिला मी दास तुझा --> "अग्निमाजी पडे बाळू| माता धावे कनवाळू ||

**किंवा**

योगी सर्वकाळ सुखदाता → "जळ वरिवरी क्षाळी मळ | योगिया सबाह्य करी निर्मळ"|

(४) प्रस्तुत कविता आवडण्याचे वा न आवडण्याचे कारण (२)

(५) प्रस्तुत शब्दांचा अर्थ लिहा. (२)

| अंकिला मी दास तुझा | **किंवा** | योगी सर्वकाळ सुखदाता. |
|---|---|---|
| (१) कनवाळू | | (१) मृदुत्व |
| (२) काजा | | (२) निर्मळ |
| (३) धेनु | | (३) मधुरता |
| (४) पाडस | | (४) निजज्ञान |

**विभाग - ३ स्थूलवाचन**

**प्र ३ रा) खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा.** **(६)**

(१) टिपा लिहा → (अ) बार्क (आ) डॉ. होमी भाभा

(२) 'प्रत्यक्ष अनुभवांतून शिकणे हे अधिक परिणामकारक असते. 'हे विधान स्वभावातून स्पष्ट करा.

(३) कवितेतील सूर्य आणि पणती या प्रतीकांचा तुम्हाला समजलेला अर्थ सविस्तर लिहा.

## विभाग ४: भाषाभ्यास

**प्र ४ था) अ) व्याकरण घटकांवर आधारित कृती**

(1) **खालील वाक्याचा प्रकार** ओळखा? **(२)**

(१) किती सोपी कवीता ही!

(२) तुझ्या सहवासात तरी मला आनंद मिळू दे.

**(2) कंसातील सूचनेनुसार वाक्य रूपांतर करा! (२)**

(१) ' काका ' तुम्ही काही झाड लावली आहेत का?

(अज्ञार्थी करा.)

(२) लठ्ठपणा काय आपल्या हातात आहे.

(विधानार्थी करा)

**(३) खालील वाक्यप्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा**. (**कोणतेही दोन**) **(४)**

(१) अंगाचा तिळपापड होणे.

(२) मळमळ व्यक्त करणे -

(३) भारावून जाणे -

**(आ) भाषिक घटकांवर आधारित कृती**:

**(१)** शब्दसंपत्तीः -

**(१) खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा. (१)**

(अ) सामर्थ्य = (आ) स्वयंपाकी =

(**२) खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा. (१)**

(अ) अस्वच्छ × (आ) कुरूप ×

**(३) शब्दसमूहाबद्दल एक शब्द लिहा. (१)**

पायात चप्पल न घालता फिरणारा. [ ]

**(४) वचन बदला**. **(१)**

(अ) चहा (आ) गोष्टी

**(२) लेखननियमानुसार लेखन**

*** खालील वाक्ये लेखननियमानुसार लिहा: (२)**

(१) साखरेत मीठाई घालून आणलि होती.

(२) "रोजचे पस्तिस - चाळीस कीलोमीटर तर नक्कीच होतात. "

**(३) विरामचिन्हे**

**खालील वाक्यात योग्य विरामचिन्हांचा उपयोग करा: (२)**

(१) तुम्ही कशा आलात ईथपर्यंत

(२) छे छे वजनाचा मार्ग भलत्याच कटयातून जातो

## विभाग -५ उपयोजित लेखन

**प्र ५ वा) अ) खालील कृती सोडवा.** **(६)**

**(१) पत्रलेखन**

खालील निवेदन वाचा व त्याखालील कोणतीही एक कृती सोडवा.

दि. २ ऑक्टोबर

वेळ स. ९:००

स्वच्छता हीच देशसेवा

ज्ञानसंपदा विद्यालय, अमरावती

स्वच्छता सप्ताहानिमित्त विशेष कार्यक्रम

' शालेय परिसर स्वच्छता '

विद्यार्थी प्रतिनिधी या नात्याने

उपक्रमात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करणारे पत्र लिहा.

**किंवा**

स्वच्छता करण्यासाठी लागणाऱ्या साहित्याची मागणी करणारे पत्र तुमच्या शाळेतील जेष्ठ सेवकांना लिहा.

**किंवा**

**(२) सारांशलेखन**

**विभाग -१ गद्य (इ) (प्र. क्र. १-इ) मधील अपठित उताऱ्याचा १/३ एवढा सारांश तुमच्या शब्दात लिहा.**

**(आ) खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडावा**: **(१०)**

**(१) जाहिरातलेखन**

(१) पुढे दिलेल्या शब्दाच्या आधारे आकर्षक जाहिरात तयार करा.

ताजा भाजीपाला, सेंद्रिय पद्धतीचा वापर, सर्व प्रकारची फळे उपलब्ध, घरपोच सोय, ऑनलाईन

बोल देण्याची सोय ग्राहकांचे समाधान.

**(२) बातमीलेखन**

२१ ऑक्टोबर

सकाळी १० ते ५

नवभारत विद्यालय नागोठाणे, रायगड

येथे शाळेतील विद्यार्थ्यांचे शासन पुरस्कृत मोफत रुबेला , मिसेल लसीकरण करण्यात आले . या प्रसंगी शाळेचे पदाधिकारी, पालक प्रतिनिधी उपस्थित होते. वरील उपक्रमाची बातमी तयार करून लिहा.

**(३) कथालेखन**

**खालील मुद्द्यांच्या आधारे कथा लिहा.**


गरीब शेतकरी ----- कोरडवाहू जमीन --------कठोर परिश्रम ------- शेतीत नवनवीन प्रयोग ---------- उत्पन्नात भरभराट --------- यशस्विता ---------------- आनंद ---------- इतरांना मार्गदर्शन ---------------- राष्ट्रीय पुरस्कार -------- बोध.

**(इ)** लेखनकौशल्य: **(८)**

**खालील लेखन प्रकारांपैकी कोणतेही एक कृती सोडवा.**


**(१) प्रसंगलेखन**

खालील मुद्द्यांच्या आधारे तुम्ही फुलवलेल्या बागेचा अनुभव तुमच्या शब्दांत लिहा.




**(२) आत्मकथन**

दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे चौकटीतील घटकांचे आत्मकथन करा.




**(३) वैचारिक:**

